Volume - 6 (2025)
Special Issue - 1 (March)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# साहित्य आणि समाज यांचा परस्परसंबंध

**प्रा. प्रतिभा एस. वडस्कर**
मराठी विभाग प्रमुख
कला-वाणिज्य महाविद्यालय, पाटणसावंगी
ई-मेल - pratibhajogi66@gmail.com
मोबाइल नं. – 7999084116

---

***सारांश :***

*साहित्य निर्मितीमधील आणि साहित्य व्यवहारांमध्ये समाज हा अत्यंत महत्त्वाचा आणि अचल असा घटक आहे. जीवन हा साहित्याचा विषय आणि भाषा हे साहित्याचे माध्यम आहे. जीवन व भाषा या दोन्ही गोष्टी समाजाधिष्ठित आहेत. साहित्य ही लेखकाची भाषिक कृती म्हणजेच भाषिक निर्मिती असते. भाषा ही एक सामाजिक संस्था आहे. विविध धर्म, पंथ, तत्त्वज्ञान व विचारसरणी यांच्या प्रभावातून साहित्य आणि समाज यांचा परस्पर संबंध दिसून येतो. व्यक्तीप्रमाणेच लेखकही समाजाचा घटकच असतो. लेखक ज्या भाषिक समूहात जन्माला येतो तेथे वाढतो. त्या भाषिक परंपरांचा त्याच्यावर खूप मोठा प्रभाव असतो.*

**मुख्य शब्द :** साहित्य व्यवहार, अनुबंध, सामाजिक संवेदना, समाजमनाचे प्रतिबिंब

---

**प्रस्तावना :**

‘साहित्य हे मानवी जीवनाचे प्रतिबिंब आहे.’ “साहित्य हा समाजाचा आरसा आहे.” अशी विविध मते आपण ऐकतो. साहित्य व समाज हे परस्परांना पूरक घटक आहे. साहित्य प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे समाजावर काही संस्कार करीत असते. कधी ते ऐकीव स्वरूपाचे, मौखिक स्वरूपाचे असेल, अगदी माणसाच्या बालवयापासून ते घडत असते म्हणजेच साहित्य आणि समाज हे एक अद्वैत असेच आहे.

कोणत्याही समाजाचा अनुबंध हा शेवटी समाजाशी असतो कारण साहित्याचा मुलाधार शेवटी मानवी जीवन आणि त्याचा समाज हाच असतो. समाजाचा साहित्यावर प्रचंड प्रभाव आहे. या प्रभावाचा व्यापक विचार करावा लागतो.

**साहित्य :**

‘साहित्य’ हा शब्द संस्कृत वाङ्मयात ‘ललित वाङ्मय या अर्थाने उपयोगात आणलेला आहे. वाङ्मय, सारस्वत ही साहित्याची पर्यायी संज्ञा आहे. “साहित्याची निर्मिती हस्तिदंती मनोऱ्यात किंवा समाज व्यवहारापासून दूर असलेल्या पोकळीत होत नाही आणि तशी ती झाली तरी या प्रकारचे साहित्य श्रेष्ठ दर्जाचे ठरत नाही. वाङ्मयनिर्मितीची पाळेमुळे समाज व्यवस्थेत रुजलेली असतात. लेखकाचा साहित्यिक पिंड घडवण्याचा तत्कालीन सामाजिक परिस्थिती त्या काळात प्रभावी असणाऱ्या विचारप्रणाली आणि त्या विशिष्ट भाषेतील वाङ्मय व शैलीविषयक परंपरा मोठ्या प्रमाणात कारणीभूत असतात.”१ साहित्य शब्दांमधून साकार होते त्यातून शब्द अनुभव प्रकट करतात. अनुभव अनेक मूल्यदर्शी भाव घटकांशी संघटित होतो. यावरून असे लक्षात येते

की, साहित्यकृती मधील अनुभूती लेखकाने समाज परिसरातून घेतलेली असते. त्यामुळे लेखकाची 'अनुभवसृष्टी' म्हणून जी संकल्पना मान्य केली जाते तिच्यावर समाजाचा प्रभाव दिसून येतो.

**समाज :**

एका समाज उद्दिष्टांसाठी एका विशिष्ट भूभागावर राहणाऱ्या व्यक्तींचा समुदाय म्हणजे 'समाज' होय. साहित्य ही एक सामाजिक संस्था आहे. ती समाजाने निर्माण केलेल्या भाषेला आपले माध्यम म्हणून वापरत असते. "समाजाच्या स्थितीगतीशी व प्रतिभाशक्तीच्या प्रेरणेशी साहित्यनिर्मिती निगडित असते. जिल्हा समाजाची संस्कृती समजण्यात येते ती समाजातील विचार कल्पनांनी व कला वाङ्मयीन आविष्कारांनीच रूपास येते." २

प्रत्येक समाजाची धारणा त्यामागील रचनातत्वे वेगवेगळी असतात. धर्म संकल्पना, रुढी, तत्त्वप्रणाली, आचार-विचार, दृष्टिकोन, संकेत, शिष्टाचार, नीतीकल्पना इ. विशेष स्वातंत्र्य वा वेगळे असते. त्या सर्वांवरच त्या - त्या समाजाची संस्कृती निश्चित होत असते. यावरून साहित्य हे जसे मानवसापेक्ष आहे तसाच मानव हा समाजसापेक्ष आहे म्हणून साहित्य आणि समाज यांच्यातील मूलभूत संबंध कोणालाच नाकारता येणार नाही. पुष्कळदा 'समाज' असे आपण म्हणतो तेव्हा आपल्याला 'लोकांचे वर्तन' अभिप्रेत असते. समाज म्हणजे एका अर्थी 'परिमीत लोकांची संस्था' च असते.'

**साहित्य आणि समाज: परस्परसंबंध :**

साहित्य आणि समाज यांचा संबंध असून साहित्य हा एक मानवी मन, बुद्धीचा व पर्यायाने समाजाचा अविष्कार आहे असे दु. का. संत म्हणतात. "जिच्या कुशीत मानवी जीवन अंकुरते जिच्या संपर्कातून ते फुलते आणि शेवटी जिच्यात ते विलीन होते त्या सृष्टीचे ते सत्यस्वरूप जाणून घेण्याची व ते प्रकट करण्याची क्षमता साहित्यात आढळते."३ साहित्य हे समाज जीवनाचे अंग असून समाज जीवनाच्या विविध अंगाचे दर्शन साहित्यातून होत असते. साहित्य समाजातून निर्माण होते. ते जीवनावर भाष्य करते. जीवनाला समृद्धी आणते म्हणून समाज जीवनाच्या अभ्यासासाठी साहित्य आणि साहित्याच्या अभ्यासाच्या संदर्भात समाज जीवन महत्त्वाचे ठरते.

"साहित्य म्हणजे भाषेच्या माध्यमाने निर्माण केलेली कला निर्मिती. साहित्यिक म्हणजे कला निर्मितीची क्षमता असलेली व कला निर्मिती करणारी व्यक्ती आणि समाज म्हणजे पारंपरिक व नव्याने निर्माण होणाऱ्या हितसंबंधाच्या संदर्भात एकत्र आलेला व एकत्र राहणारा मानव समूह."४ यावरून हेच स्पष्ट होते की, 'भाषा हे साहित्याचे द्रव्य होय.' साहित्याचे समाजावर व समाजाचे साहित्यावर बरे वाईट परिणाम होत असतात. त्याचे कारण असे देता येते की, लेखक, वाचक आणि भाषा हे साहित्य कृतीच्या संदर्भात लक्षात घ्यायला हवेत. हे तिन्ही घटक 'सामाजिक' म्हणून अशा एक वस्तूचेच भाग असतात. त्यामुळे साहित्याला एक सामाजिक परिणाम प्राप्त होत असते. त्यामुळेच तेथे कलात्मकते बरोबरच सामाजिकतेचा विचारही महत्त्वाचा ठरतो.

"साहित्य हा संस्कृतीचा एक घटक असतो. याचा अर्थ साहित्यातून समाजाचे आणि संस्कृतीचे बाह्यरूपच

नव्हे तर प्रेरणा, प्रवृत्ती व परंपरा या देखील व्यक्त होतात.''५ साहित्य हा समाजसापेक्ष व्यक्तिमत्त्वाचा अविष्कार असतो. साहित्यात लेखकाच्या आत्मनिष्ठ, जीवनदृष्टी व भावनात्मक प्रतिक्रियांना महत्त्व असल्याने प्रत्येक साहित्यकृती अनन्यसाधारण बनत असते. साहित्याची निर्मिती व्यक्ती करतो पण त्याचे वाचन, विश्लेषण, मूल्यमापन समाज करीत असतो.

यावरून साहित्य आणि समाज यांच्यातील परस्पर संबंधाचे स्वरूप लक्षात येते. लेखक हा समाजाचा घटक असतो. परिणामी त्याचे साहित्यही सामाजिक पर्यावरणाचे क्रिया, प्रतिक्रियात्मक फलित असते. साहित्य हे वैयक्तिक असून ते सामाजिक बनते असे मला वाटते.

**साहित्य आणि सामाजिक परिस्थिती :**

साहित्य सामाजिक परिस्थितीचे अपत्य मानले जाते. साहित्य आणि सामाजिक परिस्थिती यांच्यातील संबंधाचे विवेचन करताना अंजली सोमण म्हणतात, "साहित्यकृती ही प्रतिभेची निर्मिती असते आणि स्वतःची वैशिष्ट्ये पूर्णता ती जपत असते, हे खरे आहे पण त्याचवेळी ज्या काळात व ज्या परिस्थितीत ती निर्माण होते, त्या परिस्थितीचा प्रभाव व मर्यादा पूर्णपणे ओलांडू शकत नाही. हे मान्यच करावे लागते." प्रतिभावंत साहित्यिक कुठे आणि केव्हा निर्माण होईल हे सांगता येत नाही.

साहित्य म्हणजे भाषेच्या रूपाने घडलेला जीवनाचा, समाजाचा अविष्कार असतो. या संदर्भात "literature is an expression of society and speech is the expression of man" ६ हे डोबोनाल्ड यांचे उद्गार अर्थपूर्ण वाटतात. "समाज हा ज्यांचा अभ्यास विषय आहे अशा आधुनिक, सामाजिक विज्ञानांना आणि तत्त्वज्ञांना कला वाङ्मयाचा अभ्यास करणे अलीकडे आवश्यक वाटत आहे. सामाजिक संरचना, सामाजिक परंपरा, सामाजिक परिवर्तन, व्यक्ती आणि समाज यांचा परस्पर संबंध, कुटुंबजीवन, समाजकार्य, समाजसेवा, समाज कल्याण, समाजव्यवस्था इत्यादी अनेक विषय सामाजिक विश्लेषणाचे अभ्यासविषय आहे.''७ समाज विकसनशील आणि विस्तारशील आहे. संस्कृती हे या समाजाचे एक वैशिष्ट्य आहे. मानवी समाजाच्या सांस्कृतिक जीवनातील स्थितीगतीचा आलेख, निर्देश साहित्य कलांमधून प्रत्ययाला येऊ शकतो. मानवी समाजात संस्कृतीचे सुद्धा महत्त्व आहे. समाज वास्तवाला साहित्यात अनन्यसाधारण महत्त्व आहे. लेखक त्याने अनुभवलेले सामाजिक वास्तव आपल्या साहित्यातून मांडतो. त्यातून त्याच्या साहित्याला संदर्भ प्राप्त होत असतात. या संदर्भाच्या अभ्यासात साहित्य मार्गदर्शक ठरते. लेखकाच्या साहित्य निर्मितीत त्याचे सारे व्यक्तिमत्व सामावले असल्याने साहित्याचा विचार करताना, त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार तितकाच महत्त्वाचा असतो. काळ बदलला की, सामाजिक स्थितीही बदलते आणि बदलत्या स्थितीचा परिणाम साहित्यावरही दिसून येतो. स्वातंत्र्योत्तर काळानंतर दलित साहित्य, स्त्री साहित्य इ. साहित्य प्रकारात झालेला बदल हे काळाच्या सामाजिक बदलाचे उदाहरण आहे. यावरून सामाजिक स्थिती बदलली म्हणजे साहित्यातूनही बदल घडून येतात, असे सिद्ध होते.

**निष्कर्ष :**

समाज आणि वांङ्मय यांच्यातील संबंध अतूट असल्याने त्यांचा परस्परांवर प्रभाव पडत असतो. समाजात

परिवर्तन घडू लागले की, वाङ्म्यातही त्याचे पडसाद स्वाभाविकपणे उमटतात आणि त्यातही परिवर्तन घडुन येते. याच दृष्टीने आपल्याला असे म्हणता येते की, साहित्य आणि समाज यांचा परस्परांवर प्रभाव पडत असतो.

समाजजीवनाचे, समाजमनाचे प्रतिबिंब साहित्यात उमटलेले असते. साहित्यात आलेली प्रतिमा, प्रतीके, छंद ही वांङ्मयीन तंत्रे सामाजिकच असतात. समकालीन परिस्थितीच्या संसर्गाने, संपर्काने साहित्याचे विषय, आशय, शब्दसमूह, अभिव्यक्ती यावर परिणाम होत असतो.

**संदर्भ ग्रंथसूची :**


- सोमण अंजली - साहित्य आणि सामाजिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन पुणे, प्र. आ. 1982, पृ. 12
- जाधव रा.ग. - साहित्य आणि सामाजिक संदर्भ, कॉन्टिनेटल प्रकाशन पुणे, प्र. आ. 1975, पृ. 88
- प्रा. गं. बा. सरदार, “अध्यक्षीय भाषण” मुंबई व उपनगर आणि मराठी साहित्य संमेलन, अधिवेशन - एकविसावे, दि. 25 ऑक्टों.1975
- प्रा. अरविंद वामन कुळकर्णी – साहित्यविचार प्र. आ. प्रतिमा प्रकाशन पुणे, पृ. 129
- जाधव रा. ग. - कला, साहित्य आणि संस्कृती, सुगंधा प्रकाशन पुणे, प्र. आ. 1986, पृ. 8-9
- Henry Levin, literature is an institution sociology of ‘ literature and drama’ page no. 56
- जाधव रा. ग. - कला, साहित्य आणि सांस्कृतिक पूर्वोल्लेखित, पृ. 19
- द. का. संत - ‘ साहित्य आणि संस्कृती, रत्नागिरी, 1950